# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा) महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा
## प्रश्नपत्रिका एक—विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण

रविवार, दिनांक ५ ऑगस्ट, २०१८

(**वेळ** : सकाळी १०-३० ते दुपारी १-००)

(**एकूण गुण** : १००)

---

**सूचना.**—(१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

**गुण**

**प्रश्न** क्र.१ पुढील उतारा वाचून त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :- **२०**

सखू आजी सहज बोलायला लागली तरी एक कविताच बोलायची. तिच्याशी बोलताना एक अवर्णनीय आनंद मिळायचा. लहानपणी शाळेला जाता जाता आजी आम्हांला गोळा करून बसायची. शेतातल्या देवाच्या गोष्टी सांगायची. एकदा आजीनं एक गोष्ट सहज सुरू केली आणि संपवली; पण ती माझ्या मनात दीर्घकाळ रेंगाळली. आजी म्हणाली, 'शेतात एक साप होता, त्याचा माणूस झाला, त्याला पंख फुटले, तो समुद्रावर गेला, चार तपं तपश्चर्या केली, परत आला, त्याचा बैल झाला, खांदा मळला, नांगर जुंपला, फाळाला नागीण उसली, बैलाचा दातकुडी बसली, नांगराची नदी झाली, बैलाला आंघोळ घातली, त्याचा साप झाला, नागिणीला घेऊन पळाला'.... हे सांगताना आजीच्या चेहऱ्यावरचे बदलणारे भाव, हातांच्या हालचाली, या साऱ्यांतून हे सारं आपल्यासमोर घडतं आहे; आपण पाहत आहोत, असं वाटून अंगावर शहारे यायचे. ही गोष्ट ऐकल्यानंतर कित्येक दिवस ती गोष्ट माझ्या स्वप्नात जशीच्या तशी घडायची. बैल आंघोळ करायला लागला की, डोळे टक्क उघडे पडायचे. तिथून पुढे झोपच लागायची नाही. कधीतरी आपल्या स्वप्नातला साप नागिण घेऊन जाईल आणि आपल्याला हे स्वप्न पडायचं बंद होईल, असं वाटायचं.

सखू आजी गावातल्या कुणाच्याही बारशाला, लग्नाला, मयताला हटकून पुढं असायचीच. सगळं तिच्या म्हणण्यानुसार चालायचं. तिच्या शब्दाला चॅलेंज नसायचं. एकदा गावच्या लक्ष्मीची जत्रा ठरली. जत्रेत गावातली वस्तू बाहेर जाऊ द्यायची नाही, असा नियम होता. अशात सातबा घोरपडेचा पोरगा वावगं वागला. गाव बैठक बसली. पंच म्हणाले, 'रिवाजानुसार सातबाच्या पोराला दंड करा.' सगळ्यांनी माना डोलावल्या. निर्णय फायनल. एवढ्यात म्हातारी उठली; म्हणाली, पोरगं मांडीवर घाण करतंय म्हणून मांडी कापता व्हयगा ऽऽ? सगळे टाळा पगळून बघाय लागले. बोलायचं काय ? सगळे उठले. आपापल्या घरी गेले. सातबाच्या पोराला कोणीच काही बोललं—नाही.

कृ.मा.प.

एकदा सखू आजी गावातल्या आयाबाया गोळा करून आमच्या घरी आली. आमच्या भागात प्रौढ साक्षरतेचे वर्ग चालू होते. पण आमच्या गावात एकही नव्हता. म्हातारी सगळ्या आयाबायांच्या समोर म्हणाली, "आमचं पोरगं एवढं काय काय शिकलंय, आपल्याला दुसरा मास्तर कशाला पायजे. तूच शिकीव रं ऽऽ आमाला." सखू आजी पंधरा दिवसात वाचायला शिकली. सगळ्या बायकांना शिकवत सुटली. त्यावेळी आमच्या गावचा सरपंच अंगठेवाला होता. त्याला तिनं आठवड्यात सहीपुरता साक्षर केला. आमच्या गावातला चोपडा यांचा पोरगा पहिल्यांदा पोलीस झाला. म्हातारीनं गावच्या बायका गोळा करून त्याला ड्रेसवर ओवाळला. दही-साखरेनं तोंड गोड केलं. गाव म्हणजे म्हातारीचा गोतावळा.

**प्रश्न :** (अ) आजीने लेखकाला कोणती गोष्ट सांगितली ?

(ब) सखू आजीने सांगितलेल्या गोष्टीचा लेखकावर कोणता परिणाम झाला ?

(क) सातबा घोरपडेच्या मुलाला दंड का भरावा लागला नाही ?

(ड) गावात साक्षरतेचे काम आजीने कसे केले ?

(इ) सखू आजीचे व्यक्तिचित्र रेखाटा.

**प्रश्न क्र.२** गट **"अ"** मधील वाक्प्रचारांची गट **"ब"** मधील अर्थाशी समान जुळणी करा :- १०

| "अ" गट | "ब" गट |
|---|---|
| (अ) आस लागणे | (१) स्थापना करणे |
| (ब) प्रतिकार करणे | (२) लक्षपूर्वक ऐकणे |
| (क) पाया रचणे | (३) बक्षीस देणे |
| (ड) एकचित्त होऊन ऐकणे | (४) ओढ लागणे |
| (इ) मत अनुकूल होणे | (५) विरोध करणे |
| (फ) प्रलोभन दाखविणे | (६) नावलौकिक होणे |
| (ग) इनाम देणे | (७) खूप प्रयत्न करणे |
| (ह) प्रतिष्ठा वाढणे | (८) मत चांगले होणे |
| (य) आटापिटा करणे | (९) ताबा मिळविणे |
| (र) काबीज करणे | (१०) अमिष दाखविणे |

**प्रश्न क्र.३** पुढीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांचा वाक्यात उपयोग करा :- १०

| | |
|---|---|
| (अ) आवड | (ब) कार्यक्रम |
| (क) प्रगती | (ड) भावना |
| (इ) विद्यार्थी | (फ) सुंदर |
| (ग) पाऊस | (ह) व्यायाम |

**प्रश्न क्र.४** पुढीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहा :- २०

१) संत तुकाराम महाराजांनी आपल्या मनातील विठ्ठलाच्या भेटीची ओढ कोणती उदाहरणे देऊन व्यक्त केली आहे ?
२) शिरीषची गुणवैशिष्ट्ये उदाहरणांसहित स्पष्ट करा.
३) 'काझीरंगा' अभयारण्यातील एकशिंगी गेंड्याचे वर्णन लेखकाने कोणत्या शब्दांत केले आहे ?
४) व्यायामाचे महत्त्व तुमच्या शब्दांत लिहा.
५) ऑलिंपिक सामन्यांची सुरूवात कशी झाली ते सांगून सामने भरवण्यामागील उद्देश सांगा.
६) 'विज्ञानात नवे शोध लावण्यासाठी फक्त बुद्धिमत्ता पुरेशी नाही.' हे एडिसन यांनी कसे पटवून दिले आहे ?
७) वसंतऋतूच्या आगमनाने सृष्टीमध्ये कोणते बदल होतात ?
८) पक्ष्यांच्या पायांमध्ये ॲल्युमिनियमचे वाळे का अडकवतात ?

**प्रश्न क्र.५** कोणत्याही **एका** पाठाच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही **चार**) :- १०

(अ) 'जी. आय. पी. रेल्वे' या पाठाच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :-

(१) मुंबई प्रांतात रेल्वेची सुरूवात कशी झाली ?
(२) लोखंडी रूळावरून चालणारी रेल्वे बघायला लाखांवर लोक का जमले होते ?
(३) लोकांनी रेल्वेमधून प्रवास करावा यासाठी रेल्वेच्या कारभाऱ्यांना आटापिटा का करावा लागला ?
(४) रेल्वेने प्रवास करणाऱ्यांसाठी जाहीर केलेली इनामे बंद का करण्यात आली ?
(५) पुणे-मुंबई रेल्वे प्रवासाची कोणती मजेशीर गोष्ट लेखकाने सांगितली आहे ?

**किंवा**

'कुलूप' या पाठाच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(१) कुलूपांचा संग्रह मित्रमंडळीच्या नजरेस पडावा म्हणून बंडूनानांनी काय केले ?
(२) बंडूनानांच्या घरातील सर्व मंडळींना दोन दिवस उपास का काढावा लागला ?
(३) तिजोरीला कोणते कुलूप लावावे हा प्रश्न बंडूनानांना का पडला ?
(४) 'आमच्याकडचे चोरसुद्धा देशबुडवे व कलेला आश्रय न देणारे असतात.' असे बंडूनाना का म्हणाले ?
(५) बंडूनानांनी तिजोरीला लावलेल्या घंटेच्या कुलुपाबाबतचा कोणता अनुभव लेखकाने सांगितला आहे ?

**किंवा**

'तिफन' या कवितेच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(१) ‘ईज नाचते थयथय ढग ढोल वाजवते’ या ओळीचा अर्थ तुमच्या शब्दांत लिहा.

(२) पेरणीच्या दिवसांतील शेतकऱ्याच्या कुटुंबाचे वर्णन कवितेत कसे केले आहे ?

(३) कवीने पावसाळ्यातील मातीच्या सुंगधाविषयी काय म्हटले आहे ?

(४) ‘काया ढेकलात डोया हिर्व सपान पाहेते’ या ओळीचा भावार्थ सांगा.

(५) पाऊस सुरू झाल्यानंतर शेतकऱ्यांना कोणकोणती कामे करावी लागतात ?

**प्रश्न क्र.६** (अ) पुढीलपैकी कोणत्याही **पाच** इंग्रजी शब्दांचे मराठीतील पर्यायी शब्द लिहा :- ०५

(१) Calligraphy (२) Census

(३) General Meeting (४) Plumber

(५) Junior Clerk (६) Journalism

(ब) पुढीलपैकी कोणत्याही **पाच** संख्या अक्षरात लिहा :- ०५

(१) ३२८२.

(२) ५१४ – ५५ = ४५९.

(३) ३८८ ÷ ४ = ९७.

(४) ५४६ + १२३ = ६६९.

(५) ५२ × ४८ = २४९६.

(६) १९.७.

(क) रिकाम्या जागी कंसातील शब्दांचे योग्य रूप घालून ती वाक्ये पुन्हा लिहा (कोणतेही **दहा**) :- १०

(१) हा विद्यार्थी माझ्या .................... नुकताच शिकायला आला आहे. (विद्यालय)

(२) वर्गातील .................... शिक्षकांचे शिकवणे लक्षपूर्वक ऐकले पाहिजे. (विद्यार्थी)

(३) रेल्वेचा प्रवास धोक्याचा नव्हता हे पटविण्यासाठी रेल्वेच्या .................... खूप आटापीटा केला. (अधिकारी)

(४) पृथ्वीच्या पाठीवरील सर्व .................... सुमारे पाच ते सहा हजार खेळाडू या सामान्यांमध्ये भाग घेतात. (राष्ट्रे)

(५) मैत्रीचा मंत्र सांगणाऱ्या ऑलिंपिक .................... १८९४ साली आधुनिक जगाला आठवण झाली. (सामने)

(६) शास्त्रज्ञ आणि ज्योतिषी .................... अभ्यास करण्यासाठी जमले होते. (सूर्यग्रहण)

(७) घराभोवती .................... झगमगाट पहायला सारे गाव लोटले. (दिवे)

(८) आजी शेतातल्या .................... गोष्टी सांगायची. (देव)

(९) दिवसभर घराचे .................... सताड उघडे असायचे. (दरवाजा)

(१०) एकदात्यांच्या धान्याच्या कोठीच्या .................... किल्ली त्यांच्या कुटुंबाने हरवली. (कुलूप)

(११) पक्ष्यांच्या .................... अभ्यास करणे, ही सोपी गोष्ट नाही. (स्थलांतर)

(१२) पूजा संपल्यावर आई .................... नमस्कार करीत असे. (देव)

**प्रश्न क्र.७** (अ) पुढीलपैकी कोणतेही **तीन** शब्द शुद्ध करून लिहा :- ०३

(१) पतनी (२) सुवीचार

(३) सुर्य (४) प्रुथ्वी

(५) दुरदैव (६) परिक्षा

(ब) पुढीलपैकी कोणत्याही **तीन** शब्दांचे वचन बदला :- ०३

(१) नदी (२) माणूस

(३) नारळ (४) सदरा

(५) डबा (६) घर

(क) पुढीलपैकी कोणत्याही **तीन** शब्दांचे विरुद्धलिंगी शब्द लिहा :- ०३

(१) घोडा (२) मुलगी

(३) काका (४) मोर

(५) सेवक (६) राजा

(ड) कंसातील सूचनेप्रमाणे **एक** वाक्य बदलून लिहा :- ०१

(१) तो परीक्षा देणार आहे. (भूतकाळ करा)

(२) मुले अभ्यास करतात. (आज्ञार्थी वाक्य तयार करा)

-*-*-*-*-*-*-

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा) महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा
## प्रश्नपत्रिका दोन—सुसंगत लेखन व अनुवाद

रविवार, दिनांक ५ ऑगस्ट, २०१८

(**वेळ** : दुपारी २-१५ ते सायंकाळी ५-००)

(तोंडी परीक्षेचा लागणारा वेळ धरून)

(**एकूण गुण** : १००)

---

**सूचना.**—(१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

गुण

**प्रश्न क्र.१** पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार लिहा :- २०

(अ) समाज माध्यमांचा लोकशिक्षणासाठी प्रभावी वापर;
(ब) पर्यावरण संरक्षण काळाजी गरज;
(क) मुलगी वाचवा: देश घडवा.

**प्रश्न क्र.२** पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर चर्चा करा :- २०

(अ) 'शून्य कचरा' ही संकल्पना प्रत्यक्षात येईल का ?
(ब) वाढती लोकसंख्या देशाच्या विकासाला अडथळा ठरते.

**प्रश्न क्र.३** पुढीलपैकी कोणत्याही **दोन** बाबी तयार करा :- ३०

(अ) मराठी ही महाराष्ट्राची 'राजभाषा' म्हणून घोषित केल्याबद्दलचे—परिपत्रक तयार करा.
(ब) महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीवरील उपाययोजनांबाबतचे—प्रसिद्धीपत्रक तयार करा.
(क) शिक्षकांची कार्यक्षमता व कौशल्य वाढीसाठी विशेष प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्याचा प्रस्ताव शिक्षण संचालकांकडे सादर करा.

**प्रश्न क्र.४** पुढीलपैकी प्रत्येक गटातून कोणत्याही **पाच** संज्ञांचे मराठी पर्याय द्या :- १५

"**अ**" गट

(अ) Income Tax
(ब) Additional Collector
(क) Raw Materials
(ड) Examination
(इ) Backlog
(फ) Celebrity

कृ.मा.प.

"ब" गट

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | Compensation | (ब) | Dearness |
| (क) | Evaluation | (ड) | Felicitation |
| (इ) | Groundless | (फ) | Keep Pending |

"क" गट

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | Bureaucracy | (ब) | Cashier |
| (क) | Custom Duty | (ड) | Memento |
| (इ) | National Anthem | (फ) | Vacant Post |

प्रश्न क्र.५ पुढीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्यांचे मराठीत भाषांतर करा :- १५

(अ) My house is to the north of your building.

(ब) Mother's sister is called an aunt.

(क) Men learn so many things from women.

(ड) We bring butter from the shop.

(इ) The farmer cuts the crop in the field.

(फ) Every child likes milk and chocolates.

-*-*-*-*-*-*-